# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०७/०८/२०१८
## दि.०६/०८/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५०१/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | सचिन राठोड वय ३७ वर्ष रा.महाराष्ट्र हौसिंग बोर्ड येरवडा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०८/२०१८ रोजी १२/३० ते १७/०० वा.चे दरम्यान एच-१७/२८०५,महाराष्ट्र हौसिंग बोर्ड येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील ५५,०००/- रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण ३,८२,०००/- रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) के.बी.बालवडकर ८८३०७१३१०३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २४७/१८,भादविक ३८७,३२४,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२८ वर्षे,रा.बापोडी,पुणे |
| **आरोपी** | १.सुनिल उर्फ लाली शेटटी,वय-२१,रा.बापोडी,पुणे (अटक) व इतर दोन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०८/२०१८ रोजी २०/४५ वा. मुंबई-पुणे हायवे रोडलगत बोपोडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी संगनमत करून,त्यांचे हातात लाकडी दांडके व कोयता असे घातक हत्यारासह फिर्यादी यांचे दुकानावर येवुन "आमचा भाई अटक आहे,त्याला सोडवायचे आहे,त्यासाठी तु आम्हाला २०,०००/- रु दे" असे सांगुन,त्यांचेकडील कोयता बाहेर काढुन फिर्यादीचे खांदयावर ठेवुन "तुला या ठिकाणी धंदा करायचा आहे,मला तु चांगला ओळखतोस मला तुला पैसे दयावेच लागतील नाहीतर,तुझे दुकान सुध्दा व तु सुध्दा दिसणार नाही लक्षात ठेव" अशी धमकी देवुन,फिर्यादी यांना शिवीगाळ करुन,फिर्यादी यांचे पॅन्टचे खिशात हात घालुन खिशातील पैसे जबरदस्तीने काढत असताना,त्यांनी विरोध केला असता,फिर्यादी यांचा भाऊ गौरव सोडविण्यासाठी मध्ये आला त्यावेळी त्यांनी फिर्यादी व त्यांचे भावास हाताने मारहाण करुन,त्यांचे हातातील लाकडी दांडक्यांने फिर्यादीचे दंडावर मारुन जखमी केले. तसेच सदर ठिकाणी लोकांची गर्दी जमा होवु लागल्याने त्यांनी त्यांचे हातातील लाकडी दांडके व हातातील हत्यारे हवेत फिरवुन, सदर ठिकाणी दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मदन कांबळे ८८८८८६५९९७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे ८१/१८,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | गौतम ढेरे,वय-३५ वर्षे,रा.सद्गुरू अपार्टमेंट,आंबेगाव-बुद्रुक,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०८/२०१८ रोजी सकाळी ०७/१५ वा. ते दि.०६/०८/२०१८ रोजी १४/०० वा.चे दरम्यान मा.प्रांत अधिकारी,हवेली कार्यालयाचे आवारात,क्वीन्स गार्डन,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे तलाठी या पदावर कार्यतर असुन,फिर्यादी हे स्वतः व त्यांचेकडील मंडल अधिकारी तसेच इतर तलाठी यांचेसह शिवाजी चौक,मुंढवा,पुणे येथे अनधिकृत वाळु वाहतुक करणारे ट्रक ताब्यात घेऊन,त्यावर पुढील कारवाई करण्याकरीता गेले असताना, नमुद कालावधीचे दरम्यान १.एमएच/१२/ईएफ/८४७४ २.एमएच/१४/बीजे/१३२९ ३.एमएच/१२/डिजी /६४४४ ४.एमएच/४२/बी/७०४५ ५.एमएच/११/एएल/४२२४ अशा एकुण पाच अनधिकृतपणे वाळुने भरलेल्या स्थितीत वाहतुक करीत असताना मिळुन आल्याने,त्याबाबत गाडीची पाहणी करून गाडीमध्ये असलेले चालक यांचेकडे परवाना व रॉयल्टीची पावतीची मागणी केली असता,त्यांनी कोणतीही पावती नसलेबाबत सांगितले. फिर्यादी यांनी मा.तहसिलदार सो. यांचे आदेशान्वये सदरचे ट्रक हे मा.हवेली प्रांत ऑफिसचे कार्यालयात पार्क केले असताना, सदरचे पाच ट्रक पैकी ट्रक नं.१.एमएच/१२ईएफ/८४७४ २.एमएच/१४/बीजे/१३२९ ३.एमएच/ १२/डिजी/६४४४ ४.एमएच/४२/बी/७०४५ असे तीन ट्रक कोणीतरी अज्ञात इसमांनी त्यांचे संमती शिवाय तसेच ऑफिस मधील कोणाचेही संमतीशिवाय चोरून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. डी.व्हि.शिंदे ९८८११०१७८१ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ६३०/१८,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | शेखर निंबाळकर,वय-४१ वर्षे,रा.डांगे चौक,थेरगाव,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०८/२०१८ रोजी सकाळी ११/०० वा. ते दि.०६/०८/२०१८ रोजी सकाळी ०८/०० वा.चे दरम्यान जगताप नगर,थेरगाव,पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्या मोकळया जागेत |
| **तपशिल** | पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्या ग-क्षेत्रीय कार्यालयातील फिरते शौचालय गाडीचे चार लोखंडी पत्र्याचे दरवाजे व ड-क्षेत्रीय कार्यालय रहाटणी,पुणे यांचेकडील फिरते शौचालयाचे दोन्ही गाडीचे १० लोखंडी पत्र्याचे दरवाजे असे सर्व मिळुन एकुण १४ लोखंडी पत्र्याचे दरवाजे २८ हजार रू किचे सदरचे फिरते व्हॅन शौचालय हे जगताप नगर,थेरगाव,पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्या मोकळया जागेत नमुद वेळी व ठिकाणी पार्क करुन ठेवल्या असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. एस.एस.रासकर ९८२२८३१९५४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**